# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

Book 2

*Chief Editor*

**Dr. Kalyan Gangarde**

2

Scanned with OKEN Scanner

## Contents


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | *Neurosis* and Robert Browning: A Study of *Neurotic* Characters in Browning's *Porphyria's Lover* and *My Last Duchess* | Mahmudul Hasan | 5 |
| 2. | Transitoriness in the Novels of Amit Chaudhuri | Madhuri Pandey | 9 |
| 3. | Lexico-Semantic Analysis of Kashmiri Language and its Pattern in Social Context | Dr. Ravi Kant Dwivedi | 16 |
| 4. | Lal Ded and HabbaKhatoon: A Feminist Perspective | Zahoor Ahmad Zahoor | 18 |
| 5. | .Rasul Mir: the Keats of Kashmir | Zahoor Ahmad Lone | 21 |
| 6. | Memories of Pain and Suffering in Novels of Isabel Allende | Mohd Yaseen Rather | 23 |
| 7. | Customer Satisfaction on Providing Services of Life Insurance Corporation (LIC) - … | Koyel Sutar & Utpal Gain | 26 |
| 8. | Colonial Violence In The Novels Of J.M. Coetzee … | Mr. Vijayanand Bansode | 32 |
| 9. | Divergence and Coalition of Cultures in Jhumpa Lahiri's *Unaccustomed Earth* | Dr. D.R. Mane | 36 |
| 10. | Graded Inequality and Victimisation in Premanand Gajvee's *Kirwant* | Sandip Arun Ingle | 40 |
| 11. | Learner's Learning Styles, Study Habits and Academic Performance | Amita Kendurkar | 42 |
| 12. | Body –Mind Wellness and The Role Of Yoga | Dr. Vijayeshwari Rao Gudipati | 46 |
| 13. | Voicing The Voiceless: Contemperory African American Writers | Mohammed Omer Ali Hanbeh | 49 |
| 14. | Latest Trends in Human Resource Management | Dr. V. S. Kshirsagar | 52 |
| 15. | Library Knowledge Management | Garad Tukaram S. | 54 |
| 16. | Theatre of Protest: A Study of Poile Sengupta's *Mangalam* | Sneha Bhaskar | 56 |
| 17. | बुनियादी शिक्षा | ब्रम्हा नन्द मिश्र | 61 |
| 18. | स्त्रीवादी विचारवंत : ताराबाई शिंदे | प्रा. शैलजा बरुरे | 65 |
| 19. | योग और मनोस्वास्थ्य | डॉ0 नीलम श्रीवास्तव | 68 |
| 20. | आधुनिक हिंदी साहित्य कोलातूर जिले का योगदान | डॉ.रणजीत जाधव | 70 |
| 21. | ***नागपूर जिले मे निजी स्वास्थ सुविधा का अभिक्षेत्रीय तथा कालिक विश्लेशन : सन 2012 से 2016*** | डॉ. अविनाश व. तलमले<br>कु. करिष्मा क. गुप्ता | 75 |
| 22. | अनुवाद प्रकार | डॉ. सुरेश शिंदे | 83 |
| 23. | भारतीय संविधान : अभिव्यक्ती आणि मुलभूत अधिकार | डॉ. के. एम. गोलेकर | 92 |
| 24. | शिवाजी महाराजांची 'जिझिया कर' संबंधी भूमिका | सिरसाट लक्ष्मी आत्माराम | 97 |
| 25. | जागतिकीकरण आणि समकालीन स्त्री वास्तव | डॉ.माधव हैबतकर | 100 |
| 26. | भारतातील बालगुन्हेगारीची समस्या-एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. पुरूषोत्तम बांडे | 102 |
| 27. | योग आणि तानतणावाचे व्यवस्थापन | प्रा. माधव सोपानराव कदम | 106 |
| 28. | **आधुनिक महाराष्ट्राच्या विकासात शिवसेनेचे योगदान** | **डॉ. यु.डी. सावंत**<br>**प्रा. सुरेश रावसाहेब खिस्ते** | 110 |
| 29. | हिंदी महिला उपन्यास साहित्य में परिवार का चित्रण | डॉ.प्रकाश सदाशिव सूर्यवंशी | 114 |




Scanned with OKEN Scanner

23.

# भारतीय संविधान : अभिव्यक्ती आणि मुलभूत अधिकार

डॉ. के. एम. गोलेकर
सहाय्यक प्राध्यापक
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

## प्रस्तावना:-

आपण सर्वजण सामजिक जीवन जगत असताना व्यक्ती स्वातंत्र्याची आवश्यकता असते. एकाच वेळी व्यक्ती म्हणून आपल्याला एका बाजुने गरजा पूर्ण करावयाच्या असतात तर दुसऱ्या बाजूने समाजाचे एक घटक म्हणून ही कार्य करावयाचे असते. अशा सहकार्याच्या सहानुभूतीमधुनच हक्कांची निर्मिती होत असते. व्यक्ती जेव्हा एकमेकांच्या संपर्कात येतात तेव्हा त्यांच्या एकमेकांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा पडतात. त्यामुळे आपले हक्क, अधिकार मर्यादीत असतात याची जाणीव होऊ लागली. लोकशाही असणाऱ्या देशात राजकीय सहभागासाठी अधिकारांची गरज असते. यातूनच व्यक्तीच्या विविध व्यक्तीमत्व पैलूंचा विकास होत असतो. हक्क म्हणजे व्यक्तीला, व्यक्तीसमुहाला चांगले जीवन जगण्यासाठी जी सामाजिक परिस्थिती आवश्यक असते ती परिस्थिती समाजाने मान्य केलेली असते तिला हक्क असे म्हणातात. काही हक्क नैतिक तर काही हक्क कायदेशीर असतात. कायदेशीर हक्क महत्वाचे असतात कारण त्यांना सहज बदलता येत नाही शिवाय त्यांचा समावेश संविधानात केलेला असतो म्हणून त्यास मुलभूत हक्क असे म्हणतात. एखाद्या राज्याचा दर्जा कसा आहे हे समजण्यासाठी मुलभूत हक्क उपयुक्त ठरतात.

मुलभूत अधिकारांच्या मागणीची परंपरा फार जुनी आढळते. सन १२१५ मधिल मॅग्नाकार्टा या सनदेमधुन प्रथम मुलभूत हक्कांची मागणी झालेली आढळते. सन १७८९ मध्ये फ्रान्सने तर "जनतेचे आम्ही प्रतिनिधी" असा जाहिरनामाच प्रसिद्ध केला होता. अमेरिकेने घटनेत सुरूवातीस मुलभूत हक्कांचा समावेश केलेला नसला तरी घटनेला सन १७९१ मध्ये १० दुरूस्त्या करून मुलभूत हक्कांचा समावेश केलेला आहे. सन १९३६ च्या स्टॅलिन राज्यघटनेतही मुलभूत हक्कांचा समावेश आढळतो. जर्मन वायमर प्रजासत्ताकाने ही मुलभूत हक्क दिले होते.

भारतात ब्रिटीश राजवटीत अनेक वेळा मुलभूत हक्कांची मागणी करण्यात आली होती. तसेच कॉंग्रेसने मुलभूत हक्कासंबंधी अनेक ठरावही संमत करून ब्रिटीश सरकारला पाठविले होते. घटना निर्मितीच्या काळात पंडीत नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली मुलभूत अधिकारासंबंधी एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल घटना समितीला दिला. तेव्हा त्यात दोन प्रकारचे हक्क असावेत अशी शिफारस करण्यात आली. ते दोन हक्क म्हणजे,

१. न्यायालयीन स्वातंत्र्य असणारे मुलभूत अधिकार जे की कायदेशीर असतील.
२. न्यायालयीन संरक्षण नसणारे मार्गदर्शक तत्वे जे की नैतिक स्वरूपाचे असतील.

भारतीय - घटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मुलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांचे वर्गीकरण एकुण सहा प्रकारात आढळते.

१. समानतेचा अधिकार कलम - १४ ते १८
२. स्वातंत्र्याचा अधिकार कलम - १९ ते २२
३. शोषण विरूध्दचा अधिकार कलम - २३ ते २४
४. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार कलम - २५ ते २८
५. शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार कलम - २९ ते ३०
६. घटनात्मक उपयोजनेचा अधिकार कलम - ३२

## १) समानतेचा अधिकार कलम - १४ ते १८

या समतेच्या अधिकारात एकूण पाच कलमांचा समावेश होतो. भारतीय नागरिकांना त्याद्वारे समतेचा अधिकार प्राप्त झालेला आहे. या तरतूदीद्वारे समाजातील मानव निर्मित कृत्रिम विषमता नष्ट करण्यात आली आहे.

**कलम १४ :-** या कलमानुसार कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान राहतील त्यांना समानता नाकारता येणार नाही. सर्वांना कायद्याचे समान संरक्षण राहील.

**कलम १५ :-** पुर्णतः किंवा अशतः राज्याच्या पैशाने राखलेल्या जनतेच्या उपयोगा करीता सार्वजनिक ठिकाणी व्यक्तीला धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

**कलम १६ :-** सार्वजनिक नोकऱ्या, धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान किंवा निवासस्थान या कारणावरून भेदभाव करता येत नाही.

**कलम १७:-** या कलमान्वये अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. तो शिक्षेस पात्र असा फौजदारी गुन्हा समजला जातो.

**कलम १८:-** या कलमान्वये पुर्वी दिल्या जाणाऱ्या पदव्या, किताब देण्याची प्रथा बंद करण्यात आली आहे.

वरील तरतूदींच्या माध्यमातून समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न संविधानाद्वारेच करण्यात आला आहे.

## २) स्वातंत्र्याचा अधिकार कलम - १९ ते २२.

या स्वातंत्र्याच्या अधिकारात एकूण चार स्वातंत्र्याच्या कलमाचा समावेश असून यातील (१९) वे कलम अत्यंत महत्वाचे आहे, यालाच व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार म्हटले जाते. या



Scanned with OKEN Scanner

कलमाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून या व्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारात एकूण सहा स्वातंत्र्याचे अधिकार आहेत.

१. **भाषण स्वातंत्र्य, मत स्वातंत्र्य किंवा अभिव्यक्ती स्वातंत्र्य :**
या अधिकारास लोकशाहीचा कणा समजले जाते. या हक्काद्वारे आपण आपले मत, विचार वृत्तपत्रे, फलक, व्यंगचित्रे, हावभाव, भाषण इत्यादीद्वारे व्यक्त करू शकतो. मात्र असे स्वातंत्र्य अनिर्बंध स्वरूपाचे नाही.

२. **शांततापुर्वक, विनाशस्त्र एकत्र जमण्याचा अधिकार :**
या अधिकाराने सर्वांना एकत्र जमण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. मात्र यासाठी त्यांनी नि:शस्त्र शांततापुर्वक एकत्र जमले पाहीजे. शांततेचा भंग होणार असल्यास सरकार एकत्र जमण्यावर उचित बंधने घालू शकते. काही वेळा सरकारची पूर्व परवानगी घेऊन एकत्र जमण्याचा अधिकार प्राप्त करता येतो. उदा. सभा, सम्मेलने, मिरवणूका इ.

३. **संस्था किंवा संघ स्थापन करण्याचा अधिकार :**
या अधिकाराद्वारे समविचारी लोकांना व्यक्ती विकासासाठी आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक इत्यादी संघ, संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्याद्वारे ते आपल्या विचारांचा प्रसार करू शकतात मात्र अशा संस्था, संघटना, संघ विधायक कार्य करणाऱ्या असाव्यात. अशा संस्था किंवा संघटनाद्वारे देशाची एकात्मता, सार्वभौमत्व, अखंडता धोक्यात येणार असल्यास सरकार त्यावर उचीत बंधने घालु शकते. मात्र अशी बंदी न्यायालयीन कसोटीवर टिकली पाहिजे. वेश्या, पोलिस, संरक्षण दलातील लोक इत्यादींना संघटना स्थापन करता येत नाहीत.

४. **भारताच्या भुप्रदेशात मुक्त संचार करण्याचे स्वातंत्र्य :**
वरील तिन्ही स्वातंत्र्याचा व खालील दोन स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावयाचा असल्यास संचार स्वातंत्र्य आवश्यक असते. या स्वातंत्र्यामुळे भारताच्या प्रदेशात कोठेही मुक्त संचार करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात संचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र काही जनतेच्या हितासाठी, वन्य जमातीच्या हितांसाठी, रोगग्रस्त भागात, राष्ट्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाची ठिकाणे उदा. अणुप्रकल्प, लष्करी ठिकाणे, सामाजिक तणावाच्या जागा अशा ठिकाणी सरकारला संचार स्वातंत्र्यावर तर्कशुद्ध बंधने घालता येतात म्हणजेच संचार स्वातंत्र्य अमर्याद नाही.

५. **कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा करण्याचे स्वातंत्र्य :**
या स्वातंत्र्यानुसार कोणत्याही व्यक्तीला आपल्या मनपसंतीचा व्यवसाय, धंदा करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. मात्र त्यांचा धंदा किंवा व्यवसाय हा जनतेच्या, समाजाच्या हिताचा असावा अन्यथा त्यावर सरकारला बंधने घालता येतात. तसेच काही व्यवसाय व उद्योग करण्यासाठी विशिष्ट पात्रता पुर्ण करावी लागते. उदा. डॉक्टर, वकिल, इ. याशिवाय एखादा व्यवसाय किंवा धंदा शासन स्वत: पुर्ण किंवा अंशत: आपल्या हातात घेऊ शकते उदा. प्रवासी वाहतूक, कापूस एकाधिकार योजना इ.

वरील सर्व अधिकारांचा उपभोग घेतांना व्यक्तीला कोणाची बेअब्रु होणार नाही, न्यायालयाचा अवमान, परराष्ट्र संबंध प्रभावीत होणार नाहीत, सामाजिक आरोग्य बिघडणार नाही याची दक्षता घ्यावी लागते.

**कलम २०:- गुन्ह्यासाठी दोष सिद्ध झाल्यानंतरचे संरक्षण :**

या स्वातंत्र्यानुसार राज्याला कोणत्याही व्यक्ती विरूद्ध वाटेल तसा आरोप लावून त्यास दोषी ठरविता येत नाही. त्या व्यक्तीने केलेले कृत्य हे त्यावेळी अमलात असलेल्या कायद्या विरोधी आणि हे कृत्य गुन्हा ठरवले गेलेले असले पाहीजे तरच त्याला शिक्षा होईल. तसेच त्या व्यक्तीने तो अपराध करताना त्यावेळी जी शिक्षा अमलात (कायद्याने) असेल तीच शिक्षा त्याला दिली जाईल. त्यापेक्षा जास्त शिक्षा देता येणार नाही. एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा अधिकवेळा त्यावर खटला भरता येणार नाही व एकाच गुन्ह्यासाठी दोनदा शिक्षा दिली जाणार नाही आणि कोणत्याही अपराधाबद्दल स्वत: विरोधी साक्ष देण्याची सक्ती दिली जाणार नाही.

**कलम २१:- जीवन जगण्याचा अधिकार :**

या स्वातंत्र्यानुसार कोणत्याही व्यक्तीचे व्यक्तिगत व जिवीत स्वातंत्र्य सहजासहजी हिरावून घेता येत नाही, स्वत:ला देखील. मात्र कायद्याने प्रस्थापित केलेल्या पद्धतीने एखाद्या गुन्हेगाराचे जीवीत स्वातंत्र्य हिरावून घेतले जावू शकते. उदा. विनाकारण केलेल्या खुणाबद्दल फाशीची शिक्षा. सन १९८४ ते १९९१ या काळात न्यायमूर्ती भगवती यांच्या आदेशाने या कलमाची व्याप्ती खुप मोठ्या प्रमाणात वाढविण्यात ली आहे. उदा. व्यक्तीला मानवी प्रतिष्ठेने जीवन जगण्याचा अधिकार, बालकांच्या कोवळ्या वयाचा दुरूपयोग टाळणे, शिक्षण, आरोग्य, पाणी, सकस आहार, कायदेशीर सल्ला इ. एकवीस बाबींचा त्यात समावेश करण्यात आलेला आहे.

**कलम २१ 'अ':- शिक्षणाचा अधिकार :**

हा शिक्षणाचा अधिकार मुलभूत अधिकारांमध्ये अंतर्भुत नव्हता, तर तो पुर्वी राज्याच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये समाविष्ठ होता. सन. २००२ मध्ये घटनेला ८६ वी घटना दुरूस्ती करण्यात आली आणि शिक्षणाचा अधिकार मुलभूत अधिकारांमध्ये समाविष्ठ करण्यात आला. यानुसार राज्य हे सहा ते चौदा वर्षापर्यंतच्या बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण राज्याने निर्देशित केलेल्या कायद्याप्रमाणे व ठरविल्या प्रमाणे दिले जाते. असे असले तरी श्रीमंताच्या शाळा गरीबांचे शिक्षण गिळंकृत करत आहेत.

**कलम २२ :- विशिष्ट गुन्ह्यासाठी अटक व स्थानबद्धता या पासून संरक्षण :**

या अधिकारानुसार कोणत्याही व्यक्तीला अटक केल्यास, अटक करताना शक्य तितक्या लवकर अटकेची कारणे सांगणे आवश्यक आहे किंवा त्या व्यक्तिला ती जाणून घेण्याचा अधिकार आहे. त्याशिवाय त्याला जेलमध्ये टाकता येणार नाही. अटक झाल्याला व्यक्तीला आपल्या पसंतीच्या विधितज्ञाचा सल्ला घेण्याचा, त्याद्वारे स्वत:चा बचाव करण्याचा अधिकार आहे. अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत न्यायाधिशासमोर हजर केले पाहिजे. यामध्ये प्रवासाचा कालावधी वगळून कोणत्याही व्यक्तीला न्यायाधिशांच्या परवानगी शिवाय २४ तासांपेक्षा जास्त काळ अटकेत



Scanned with OKEN Scanner

ठेवता येणार नाही. मात्र याला काही अपवाद आहेत. शत्रू देशातील व्यक्ती किंवा प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या कायद्याखाली अटक झालेल्या व्यक्तीस २४ तासांपेक्षा जास्तकाळ न्यायालयाच्या परवानगी शिवाय तुरूगांत ठेवता येते.

## ३) शोषणाविरूद्धचा हक्क - कलम २३ ते २४:

या कलमाद्वारे व्यक्ती व नागरीक यांना शोषणाविरूद्धचे काही हक्क प्राप्त झालेले आहेत.

**कलम २३:- माणसांचा व्यापार करण्यास व वेटबिगारास मनाई :**

या कलमान्वये माणसांच्या व्यापारास, खरेदीविक्रीस सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही व्यक्तीला वेठीस ठेवता येणार नाही किंवा वरील स्वरूपातील अन्य वेटबिगारास मनाई करण्यात आली आहे. उदा. वेश्या व्यवसाय, देवदासी प्रथा, गुलामगिरी, महिलांची पुरूषांची विक्री इ. जर कोणी वरील तरतूदींचे उल्लंघन केले तर तो शिक्षेस पात्र गुन्हा असेल. मात्र अपवादात्मक परिस्थितीत राज्य कोणत्याही व्यक्तीकडून सक्तीने काम करून घेऊ शकते. उदा. सक्तीची लष्कर भरती.

**कलम २४:- कारखाने, जोखमीची ठिकाणे इत्यादीमध्ये बालकांना कामास ठेवण्यास मनाई :**

या कलमानुसार १४ वर्षा खालील बालकास कोणत्याही कारखान्यात, खाणीत अथवा जोखमीच्या ठिकाणी, धोक्याच्या ठिकाणी कामावर, नोकरीस ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. पण भारतात अजूनही हजारो बालकामगार काम करतना आढळतात. पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणे भारतात बालकामगार कायदा राबविला जात नाही.

## ४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क कलम - २५ ते २८

या कलमाद्वारे व्यक्ती व नागरीक यांना मोठ्या प्रमाणात धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क प्राप्त झालेली आहेत. परंतू हा आधिकार त्याने भारताचे सार्वभौमत्व, सामाजिक आरोग्य व राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येणार नाही या पद्धतीने उपभोगावयाचे आहेत.

**कलम २५:- धर्माचे मुक्तपणे आचरण, उच्चार, प्रचाराचे स्वातंत्र्य :**

या कलमानुसार सर्व व्यक्तींना कोणत्याही धर्माचा स्वमर्जीने स्वीकार करण्याचा, आचरण, प्रचार, प्रसार करण्याचे स्वातंत्र्य आहे. एखाद्या धार्मिक संस्थेची आर्थिक स्थिती विस्कळीत झाली असेल व तसे सरकारला वाटल्यास तिच्यावर सरकारला नियंत्रण घालता येईल. तसेच सामाजिक सुधारणेसाठी धार्मिक हक्कांवर बंधने घालण्याचा अधिकार सरकारला आहे. उदा. हुंडा पद्धत, सती प्रथा, देवदासी प्रथा, तीन तलाख पद्धती, नरबळी, सर्वांना मंदीर प्रवेश इ.

**कलम २६:- धार्मिक व्यवहारांची व्यवस्था पाहणे :**

या कलमातील तरतूदीनुसार धर्मिक संस्था स्थापन करणे, त्या स्वखर्चाने चालविणे, त्या धार्मिक संस्थांचा व्यवहार, व्यवस्था पाहणे याशिवाय एखाद्या धार्मिक संस्थेच्या खर्चासाठी स्थावर व जंगम मालमत्ता मिळविण्याचा, ती मालकीची करून घेण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. तसेच त्या संपत्तीचे कायद्यानुसार प्रशासन करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा अधिकार सर्व व्यक्तींना प्राप्त झालेला आहे.

**कलम २७:- एखाद्या विशिष्ट धर्माच्या संवर्धनासाठी, प्रसारासाठी कर देण्याचे स्वातंत्र्य :**

या कलमानुसार ज्या धार्मिक कराचे उत्पन्न एखाद्या विशिष्ट धर्माच्या किंवा धर्मपंथांच्या संवर्धनासाठी तसेच प्रसारासाठी वापरले जाणार असेल, खर्चीले जाणार असेल तर असा कर देण्याची सक्ती कोणत्याही व्यक्तीवर केली जात नाही, करता येणार नाही. मात्र स्वखुशीने तो मदत करू शकतो. पण सर्वच धर्मांना सारख्या मदतीसाठी कर बसवीता येईल उदा. ट्रस्ट चांगले चालावे, शासकिय यंत्रणेचा खर्च निघावा यासाठी कर बसविता येईल. उदा. जगन्नाथ देवालय ट्रस्ट विरूद्ध ओरीसा राज्यसरकार खटला. कारण या करातून सर्व धर्मियांना सारखी सेवा मिळते.

**कलम २८:- शैक्षणिक संस्थामधून धर्मिक शिक्षण अथवा धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याचे स्वातंत्र्य :**

या कलमानुसार पुर्णतः किंवा अंशतः सरकारच्या पैशातून चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थातून धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. मात्र ज्या शिक्षण संस्थेचा कारभार सरकार चालवते पण धार्मिक शिक्षण देणे ही त्या संस्थेची अट असेल तर त्यांना या कलमातील वरील तरतूद लागू होत नाही. म्हणजेच ती शैक्षणिक संस्था धार्मिक शिक्षण देऊ शकते. सरकार मान्य केलेल्या किंवा खुद्ध सरकाराकडुन मदत मिळत असलेल्या खासगी शिक्षण संस्थातून धार्मिक शिक्षण देण्यात येत असल्यास ते धार्मिक शिक्षण घेतलेच पाहिजे, उपासनेला उपस्थित राहिलेच पाहिजे असे बंधन व्यक्तींवर घालता येणार नाही.

## ५) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार कलम २९ ते ३०

या अधिकारानुसार कोणत्याही व्यक्तीस आपले सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार जोपासण्याचा अधिकार प्राप्त झालेले आहेत.

**कलम २९:- कोणत्याही भारतीय नागरिकास भाषा, लिपी, संस्कृती रक्षणाचा अधिकार :**

या कलमान्वये भारताच्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही नागरिकास, नागरी गटास आपली स्वतःची भाषा, लिपी, संस्कृती जतन करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. राज्याच्या खर्चातून चालणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थात कोणत्याही नागरीकास केवळ धर्म, वंश, जात आणि भाषा या कारणावरून प्रवेश नाकारता येत नाही. या शैक्षणिक अधिकाराबाबत न्यायालयाने वेगवेगळे निकाल दिलेले आहेत. उदा. चंपाकम विरूद्ध मद्रास राज्य, शांताबाई विरूद्ध मद्रास विश्वविद्यालय, अंजली विरूद्ध कलकत्ता या सारख्या खटल्यातून अनेक शैक्षणिक अधिकार प्राप्त झाले आहेत.

**कलम ३०:- अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांचे प्रशासन चालविण्याचा अधिकार :**

या कलमातील तरतूदीने धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक वर्गांना आपल्या पंसतीच्या शैक्षणिक संस्था स्थापन करून त्यांचे



Scanned with OKEN Scanner

प्रशासन चालविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. राज्याला अशा शैक्षणिक संस्थाना सहाय्य करताना ती संस्था धार्मिक किंवा भाषा या निकषावर तसेच अल्पसंख्यांक समाजाच्या व्यवस्थापनाखाली आहे म्हणून तिच्या विरूद्ध प्रतिकूल भेदभाव करता येणार नाही. त्यामुळे भारतातील विविध अल्पसंख्यांक गटांना, समुहांना त्यांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार प्राप्त झालाआहे.

## ६) घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार कलम - ३२

मुलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी घटनात्मक उपाययोजनांच्या तरतूदीचा समावेश कलम ३२ मध्ये करण्यात आलेला आहे. त्यामुळे मुलभुत हक्कांना संरक्षण प्राप्त झालेले आहे. डॉ. बी. आर. आंबेडकर या घटनात्मक उपयोजनेच्या हक्कास संविधानाचा आत्मा असे म्हणतात. या ३२ व्या कलमान्वये सर्वोच्च न्यायालयास व २२६ कलमान्वये उच्च न्यायालयास पाच प्रकारचे आदेश काढता येतात.

**१) बंदी प्रत्यक्षीकरण :**

बंदी प्रत्यक्षीकरणास हेबिअस कॉर्पस असेही म्हणतात. ही एक लॅटीन भाषेतील संज्ञा आहे. त्याचा अर्थ 'शरीर हजर करा' असा होतो. अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत न्यायालयासमोर हजर करणे व अटकेची कारणे सांगणे बंधनकारक आहे. मात्र त्यापेक्षा जास्त काळ त्या व्यक्तीला अटकेत ठेवल्यास त्याच्या नातेवाईकांना, मित्राला न्यायालयासमोर घटनात्मक अर्ज करता येतो. यालाच बंदी प्रत्यक्षीकरणाचा हक्क असे म्हणतात. असा अर्ज न्यायालयात दाखल होताच ज्यांनी अटक केली त्यांना व ज्याला अटक केली त्या व्यक्तीला न्यायालयासमोर हजर केले जाते. तेव्हा दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकूण केलेली अटक योग्य की, अयोग्य आहे हे ठरविले जाते. अटकेची सबळ कारणे देता आली नाही तर अटक बेकायदेशीर ठरवून संबंधीतास सोडून देण्याचा आदेश दिला जातो. उदा. मुंबई पोलीसांनी एका साप्ताहिकाच्या एका संपादकाला अटक केली होती तेव्हा त्याने बंदी प्रत्यक्षीकरणाचा अर्ज न्यायालयात दाखल केला होता, तेव्हा सरकारतर्फे (पोलीस) अटकेची सबळ कारणे देता आली नाहीत म्हणून त्याला सोडून देण्याचा आदेश दिला. सन १९९७ - ९८ मध्ये अरूण गवळी यास मुंबई पोलीसांनी अटक केली तेव्हा २४ तासांच्या आत त्याला न्यायालयासमोर हजर करण्यात आले नाही. म्हणून त्याची पत्नी आशा गवळी हिने न्यायालयात हेबिअस कॉर्पसचा अर्ज दाखल केला होता तेव्हा न्यायालयात दोन्ही बाजूने युक्तीवाद होऊन अरून गवळीची अटक न्यायालयाने वैध ठरविली होती. कारण अरूण गवळी यास स्थानबद्धता प्रतिबंधात्मक काद्याखाली अटक झाली होती. म्हणून या कायद्यास काही बाबी अपवाद आहेत.

**२) परमादेश :**

एखादी संस्था, व्यक्ती, व्यक्तीसमुह यांच्याकडून एखाद्यावर अन्याय होतो तेव्हा त्याविरूद्ध असा अर्ज संबंधीतांना करता येतो. याचा सरळ अर्थ "आम्ही आज्ञा देतो" असा होतो. एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेकडून कर्तव्य बजावत असताना नकार दिला जातो, तो चुकतो किंवा तो अन्याय करतो तेव्हा त्या अन्यायाच्या परिमार्जना करीता परमादेश अर्ज न्यायालयात करता येतो. असा अर्ज न्यायालयात मंजूर झाल्यास संबंधीताला संबंधीत अन्याय दूर करण्याचा आदेश, आज्ञा न्यायालय देते.

**३) प्रतिषेध :**

याचा शब्दशः अर्थ म्हणजे 'बंदी घालणे' असा होतो. एखाद्या खटल्यात अनियमितता असल्यास, खटल्याचे कामकाज व्यवस्थित चालत नसल्यामुळे तो खटला कनिष्ट न्यायालयाच्या अधिकाराक्षेत्रा बाहेरचा असल्यास, त्या खटल्यात न्यायालयाचे हितसंबंध गुंतलेले असल्यास त्या व्यक्तीला न्याय मिळणे अवघड होत असेल तर असे नियमित न चलाणारे कामकाज थांबवण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येतो. हा अर्ज मंजूर झाल्यास उच्च न्यायालय बंदी हुकूम काढून कनिष्ठ न्यायालयातील कामकाज थांबवावे असा प्रतिषेध, आदेश फक्त न्यायीक किंवा अर्ध न्यायीक अधिकाऱ्याविरूद्ध देते. या आदेशाची कोणताही पक्ष उपेक्षा करू शकत नाही तसे झाल्यास तो न्यायालयाचा अवमान समजला जातो.

**४) उत्प्रेषण :**

याचा अर्थ 'काम वर्ग केले जावे, प्रमाणीत करावे, माहिती द्यावी' असा होतो. कनिष्ठ न्यायालयाने, न्यायाधिकारणामध्ये प्रलंबीत असणारा खटला वरिष्ठ न्यायालयाकडे वर्ग करण्यासाठी किंवा खटल्यात दिलेला आदेश रद्द करण्यासाठी वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयाला असा आदेश देते. म्हणजेच एखादा खटला कनिष्ठ न्यायालयाच्या कक्षे बाहेर असूनही तो चालवला जात असेल किंवा तो चालविण्यास ते न्यायालय असमर्थ असतानाही तो चालविला जात असल्यास असा अर्ज करता येतो.

असा अर्ज मान्य झाल्यास खालच्या न्यायायात चालू असलेल्या खटल्या बाबत आदेश काढून तो खटला वरिष्ठ न्यायालय स्वतःकडे दाखल करून घेते. त्यावेळी खटल्याची सर्व कागदपत्रे, पुरावे, वरिष्ठ न्यायालयाकडे पाठवून घ्यावी असा उच्च न्यायालय कनिष्ठ न्यायालयास आदेश देते.

प्रतिषेध व उत्प्रेषण मध्ये महत्वाचा फरक म्हणजे प्रतिषेद हा कनिष्ठ न्यायालयांनी खटल्याचे कोणतेही काम करू नये असा आदेश देण्याचा लेख आहे. तर उत्प्रेषण हा कनिष्ठ न्यायालयातील खटला कागद पत्रासह वरिष्ठ न्यायालयाकडे वर्ग करावा या बाबतचा आदेश आहे.

**५) अधिकार पृच्छा :**

याचा अर्थ असा होतो की 'आपण जे कार्य (पदावर ) करीत आहात हे कोणत्या अधिकारात करीत आहात' शासकिय किंवा सार्वजनिक पदावर अधिकार नसताना अथवा पात्रता नसताना एखादी व्यक्ती ते पद भुषवीत असेल तर त्या विरूद्ध व्यक्तीस अधिकार पृच्छा अर्ज करता येतो. त्यावेळी न्यायालय चौकशी करण्यासाठी आदेश काढते. जर त्या व्यक्तीने अवैधरित्या शासकिय पद बळकावले असल्यास त्याला प्रतिबंध घातला जातो. मात्र असे पद राज्यघटनेने किंवा कायद्याने निर्माण केलेले कायमस्वरूपी असले



Scanned with OKEN Scanner

पाहिजे. मंत्री पदासाठी किंवा खासगी पदासाठी असा आदेश देता येत नाही. असा अर्ज कोणताही हितसंबंधी व्यक्ती करू शकतो.

## सारांश :

भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार हे भारतीय लोकशाहितील आदर्शांना चालना देणारे असून लोकांच्या स्वातंत्र्याचे जतन करणारे आहेत. कायद्याचे राज्य स्थापन करणे किंवा आणणे हा प्रमुख उद्देश आढळतो. या हक्कांना घटनेने संरक्षणाची हमी दिल्याने त्यांना खरे मुलभूत हक्काचे स्वरूप प्राप्त झाले आहे. हे हक्क व्यक्ती व नागरीक असे दोघांसाठी असून ते अनिर्बंध नाहीत. फक्त कलम २० व २१ स्थगीत करता येत नाहीत. तर यातील काही हक्क नकारात्मक आहेत. तर काही सकारात्मक स्वरूपाचे आढळतात. जर हक्कांची अंमलबजावणी होत नसेल तर न्यायालयात जाता येते. मात्र हे हक्क दैवी किंवा अपरीवर्तनिय आढळत नाहीत.

## निष्कर्ष

१) मुलभूत अधिकार राजकारण्यांच्या हातातील खेळणे बनु पहात आहेत.
२) काही मुलभूत अधिकार संदिग्ध, अस्पष्ट , अनिश्चित आढळतात.
३) मुलभूत अधिकारांवर अनेक मर्यादा आहेत.
४) आणीबाणीच्या काळात हक्क निलंबित होतात.
५) घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार खर्चीक स्वरूपाचा आहे.

## संदर्भ

१) एम. लक्ष्मीकांत, इंडियन पॉलिटी
२) तुकाराम जाधव, भारतीय संविधान व भारतीय राजकारण.
३) भा. ल. भोळे, भारतीय शासन आणि राजकारण
४) डॉ. विजय तुंटे, भारतीय राज्यव्यवस्था.
५) दुर्गा दास बसू, भारतीय राजघटनेची ओळख.

❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner